दिनांक: १४ ऑगस्ट २०२१

मासिकांक ६



# “ती”चं पान

## तिच्याकडून सगळ्यांसाठी

संपादक: सौ. सायली अक्षय देशपांडे

# अनुक्रमणिका


| | शीर्षक | लेखिका | पान क्र. |
|---|---|---|---|
| १ | प्रस्तावना | सौ. सायली अक्षय देशपांडे | ३ |
| २ | दोन शब्द | अनुराग वैद्य | ४ |
| ३ | गाथा स्वातंत्र्याची | कु. संजीवनी मराठे | ७ |
| ४ | देशभक्ता प्रासाद बंदिशाला.. | कु. निर्मिती देवलसी | ८ |
| ५ | मोर तो आता | सौ. रेणुका देशपांडे कुकडे | १० |
| ६ | झेंडा अमुचा प्रिय देशाचा | सौ. दिशा टिकेकर | ११ |
| ७ | तो सूर्य तळपला तेव्हा | कु. भार्गवी बाबरेकर | १२ |
| ८ | स्वातंत्र्य? की अजूनही पारतंत्र्य? | सौ. मृण्मयी सारंग | १३ |
| ९ | भारत 'माझा' देश आहे | सौ. तृष्णा आंबेकर | १४ |
| १० | राष्ट्राय स्वाहा इदं न मम | सौ. सायली अक्षय देशपांडे | १८ |
| ११ | प्रिय आईस | कु. स्वर्णिमा प्रकाश | २० |
| १२ | मी भारतमाता बोलतेय | कु.  प्राजक्ता बर्वे | २२ |
| १३ | समारोप | सौ. सायली अक्षय देशपांडे | २४ |

# प्रस्तावना

भारतीय कालगणनेत जसे आपले सण उत्सव आपल्या परंपरांचं प्रतिनिधित्व करतात त्यात भर घालणारी एक परंपरा म्हणजे आपले राष्ट्रीय सण साजरे केले जाणे. “ती” चं पान या उपक्रमाचा हा सहावा मासिकांक. म्हणता म्हणता ६ महिने या अंकाला झाले. प्रत्येक अंक हा वेगवेगळ्या भूमिकेत सजलेला. तर यावेळी अंकात वसलेलं शब्दांचं गाव हे “स्वातंत्र्य” आणि “स्वातंत्र्यदिन” हा दोन शब्दांभोवती वसलेलं. शालेय जीवनात असल्यापासून ते आजपर्यंत प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्यदिन हे अगदी राष्ट्रीय सण असल्यासारखे साजरे केले जातात. त्यादिवशी मिळणारी ऊर्जा,राष्ट्रगीत गाताना अभिमानाने भरून येणारा उर, सलामी, देशभक्तीपर गीत या सगळ्या वातावरणात एक प्रकारची ऊर्जा असायची प्रेरणा असायची.

देश हा फक्त नकाशातला तुकडा नसून तो एक "राष्ट्रपुरुष" आहे हे मनात कुठेतरी बिंबवलं जायचं.तेच प्रतिबिंब या अंकात या सगळ्या लेखिकांच्या लिखाणात वाचकांना नक्कीच गवसेल. अशी मला खात्री आहे. कथा,कविता,लेख या माध्यमातून प्रत्येकीने आपले विचार इथे मांडले आहेत. तेव्हा सर्वप्रथम या सगळ्या जणींचे खूप खूप कौतुक. इतिहास आणि पुरातत्व या देशाचा सांस्कृतिक वारसा जपणाऱ्या विषयांचे गाढे अभ्यासक असलेल्या अनुराग वैद्य यांनी दोन शब्दांच्या माध्यमातून या अंकाला शब्दरूपी शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच या अंकाला सर्वांगसुंदर बनवणाऱ्या श्री.अक्षय देशपांडे यांचे मनःपूर्वक धन्यवाद.

तेव्हा "ती" च्या प्रवासात तुम्ही सुद्धा सहभागी होऊन आनंद घ्या...सगळ्या वाचक रसिकांना स्वातंत्र्यदिनाच्या खूप खूप शुभेच्छा...!

- सौ. सायली अक्षय देशपांडे

# दोन शब्द

## “महाराष्ट्र नावाचा इतिहास”

महाराष्ट्र हे नाव कसे उत्पन्न झाले किंवा या नावाची व्युत्पत्ती कशी झाली याचा शोध घ्यायचा आजपर्यंत खूप जणांनी प्रयत्न केला आहे या नावामुळेच महाराष्ट्राच्या इतिहासात लपलेले असंख्य धागे आपल्याला मिळू शकणार आहेत. यासाठी प्रत्येक देशाच्या नावातील रहस्य समजून घेणे फार महत्वाचे आहे. जगातील प्रत्येक राष्ट्राच्या कितीतरी ऐतिहासिक कोड्यांचा उलगडा हा राष्ट्राच्या नामाभिधानावरुन झालेला आपल्याला पाहायला मिळतो. पण आजही महाराष्ट्र हे नाव कसे पडले याबाबत बरीच गुंतागुंत आपल्याला बघायला मिळते. महाराष्ट्र हा शब्द प्राचीन आहे का किंवा नाही ह्यावरून देखील अनेक मतभेद आपल्याला बघावयास मिळतात. आजही संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अशी समजूत आहे कि महाराष्ट्र हा शब्द पूर्वीपासून असून महाराष्ट्रात राहणारे ते मरहट्ट अशी आजही समजूत आहे.

महाराष्ट्राच्या इतिहासात  डोकवले असता महाराष्ट्राला तीन हजार वर्षांची परंपरा असलेली आपल्याला दिसते. हि परंपरा सुरु होते ती अगस्त्य ऋषींपासून वेद किंवा जुने पुरावे शोधून काढले तर दंडकारण्य हा उल्लेख आपल्याला महाराष्ट्राबद्दल सापडतो. शकांच्या आक्रमणापूर्वी तिसऱ्या शतकात साधारणपणे आर्यांचे या प्रदेशात येणे जाणे देखील चालू झालेले उत्खननात सापडलेल्या पुराव्यांवरून आपणास पहावयास मिळते. शकांच्या पूर्वी इथे काही छोटे छोटे गोत्रे राहत होती ती गोत्रे 'रट्ट' म्हणजेच 'मरहट्ट' आहेत. हि लोक आजूबाजूच्या प्रदेशावर आपळी राज्य गाजवू लागली आणि या सर्व छोट्या राज्यांचे मिळून महाराष्ट्र बनले.

या 'रहट्ट' या शब्दावरून महाराष्ट्र हे नाव तयार झाले परंतु या समजुतीला काहीच आधार नाही असे आपल्याला दिसते. आजच्या आपल्या बोलण्यात आणि लिखाणात बऱ्याचदा 'मराठा' ( देश ) आणि मराठी ( भाषा ) असे शब्द वापरले जातात परंतु प्राचीन साहित्यामध्ये डोकावले असता शक्यतो ज्ञानेश्वरी किंवा कोणताही महानुभाव साहित्यामध्ये हा उल्लेख हा 'मऱ्हाट किंवा मरहट्ट' या नावाने आपल्याला बघावयास मिळतो. मऱ्हाट किंवा मरहट्ट हि नावे प्राचीन असून शुद्ध आहेत परंतु महाराष्ट्र हे नामाभिधान यापेक्षाही प्राचीन साहित्यामध्ये आपल्याला दिसून येते.

नाणेघाटात सातवाहनांचा उल्लेख ( महारठ गणाचा सदस्य ) असा केलेला आहे.

'मरहट्ट' हा शब्द प्राचीन 'महाराष्ट्र' या शब्दापासून तयार झाला असावा असे आज गृहीत धरले जाते. 'मरहट्ट' हा शब्द इ.स. ९ व्या शतकात अपभ्रंश 'काव्यत्रयी' यामध्ये आलेला आपल्याला पहावयास मिळतो. इ.स. ८ व्या शतकात 'कोहुअल' कवी होऊन गेला त्याने जे काव्य लिहिले ते काव्य त्याने 'मरहट्टी' देशात लिहिले असे सांगतो. 'महाराष्ट्र' हा शब्द वरुचीच्या प्राकृत व्याकरणामध्ये आपल्याला आढळून येतो हा 'वरुची' ख्रिस्तपूर्व काळामध्ये होऊन गेला तसेच बौद्ध धर्माचा जो 'महावंस' नावाचा ग्रंथ आहे त्यामध्ये महाराष्ट्र या शब्दाचा उल्लेख येतो.

'महावंस' हा ग्रंथ साधारणपणे इ.स. ५ व्या शतकाच्या मध्यात झाला असे मानले जाते. इ.स. ६ व्या शतकातील वराह मिहीर याने लिहिलेल्या ' बृहत संहिता ' या ग्रंथात महाराष्ट्र हे नाव आपल्याला आढळते. इ.स. ७ व्या शतकामध्ये बदामी चालुक्य राजा दुसरा पुलकेशी दुसरा याच्या दिग्विजयाचे वर्णन करणाऱ्या ऐहोळे शिलालेखात 'महाराष्ट्राचे' नाव कोरलेले आहे. नाणेघाटात सातवाहनांचा जो शिलालेख उपलब्ध आहे त्यामध्ये सातवाहनांचा उल्लेख हा 'महारठिनो गणकइरो' म्हणजे (महारठ गणाचा सदस्य) असा केलेला आपल्याला दिसतो. हा उल्लेख इ.स.पूर्व पहिल्या  शतकात केलेला आपल्याला आढळतो.

'वरुचीच्या' काळापासून आपल्या देशाचे नाव हे 'महाराष्ट्र' आहे त्यापूर्वी कित्येक शतके हे नाव अस्तित्वात असावे हे आपल्याला 'महाराष्ट्र' या प्रचलित नावाच्या सर्वदूर पसरलेल्या किर्तीवरून समजते. परंतु अशोकाच्या कोणत्याही शिलालेखात 'महाराष्ट्र' हे नाव आपल्याला दिसत नाही अगदी त्याने 'नालासोपारा' येथे जो स्तूप उभारला त्या स्तूपाच्या इथे जो प्रस्तरलेख मिळाला आहे तेथे देखील 'महाराष्ट्र' हे नाव आढळत नाही. त्यामुळे 'महाराष्ट्र' नावाने ओळखला जाणारा आजचा प्रदेश कोठे अस्तित्वात होता हे त्या काळामधील ऐतिहासिक लेखांवरून समजत नाही.

ह्युआन श्वांगसारख्या चिनिप्रवाश्यांनी केलेले वर्णन 'महाराष्ट्र' नावाच्या उत्पत्तीसाठी महत्वपूर्ण ठरते.

आजच्या मराठ्यांच्या पूर्वजांचा उल्लेख पाहायला गेले तर प्राकृत ग्रंथातून हा उल्लेख 'मरहट्टे' असा येतो तसेच संस्कृत ग्रंथामधून यांनाच 'महाराष्ट्रिक' असे संबोधलेले आपल्याला आढळून येते. इ.स. १० व्या शतकातील राजशेखर कवी सांगतो कि महाराष्ट्रीय कुलवधूशी लग्न केले आहे. ती महाराष्ट्रीय कुलवधू हि चाहुआन म्हणजेच आजचे चव्हाण कुळातील होती असे तो लिहितो. मराठ्यांना कानडी आणि तामिळ लोक 'आरीयेरू' या नावाने ओळखतात. आरीयेरू ह्याचा संबंध पार दुसऱ्या शतकापर्यंत जातो.

ह्युआन श्वांग जेव्हा भारतात आला होता तेव्हा त्याने महाराष्ट्राचा उल्लेख ' महोलचे ' असा केला आहे तसेच ह्युआन श्वांग याने महाराष्ट्राचे वर्णन करताना असे लिहिले आहे कि महाराष्ट्राची जमीन अत्यंत सुपीक आहे तसेच महाराष्ट्रातील लोक हि साधी परंतु तापट आहेत यांच्याशी कोणी लढाई देखील केली तर हि लोक त्यांचा पाठलाग करून शत्रूस मारतात तसेच या प्रदेशाचे दुसरे नाव हे 'दंडकारण्य असे देखील आहे'. अश्या प्रकारे महाराष्ट्र हे नाव पडलेले आपल्याला दिसते.

महत्वाचे:-

१) सह्याद्रीमध्ये फिरताना योग्य ती काळजी नक्की घ्या. सह्याद्री हे डोंगरभटक्यांचे घर आहे.

२) कुठल्याही किल्यावर, लेणीमध्ये, प्राचीन मंदिरामध्ये किंवा कोणताही ऐतिहासिक वारसा फिरताना योग्य ते भान ठेवा.

३) सह्याद्रीमध्ये फिरताना आणि नवीन अनुभव गाठीशी बांधताना हे ध्यानात ठेवा कि त्या ठिकाणी फक्त आपल्या आठवणीच्या  पाऊलखुणा ठेवाव्यात.

४) धबधब्या मध्ये जात असाल तर योग्य ती सुरक्षा बाळगा अन्यथा पाण्याचा प्रवाह जर वाढला तर दुर्घटना होण्याची शक्यता जास्त असते त्यामुळे योग्य ती खबरदारी घेऊन धबधब्यात उतरणे चांगले परंतु धबधबा हा थोडे सुरक्षित अंतर ठेऊन पाहिलेला कधीही चांगला.

-अनुराग वैद्य,

इतिहास अभ्यासक, पुणे

# गाथा स्वातंत्र्याची

जखडलेली त्या शृंखलांमध्ये
माझी जन्मभूमी आहे
फाटलेल्या पदरांतुनी  तिचे अश्रू ढळताहे

संतांची भूमी ही,  विश्वधर्म सांगते
अशी माझी पुण्यभू सहिष्णुतेने वागते

गोरा रंग हा कोठल्या लहरींवरूनी आला
मूल्य ,धर्म, शास्त्राला ,लपेटू  लागला

मोहाची शुभ्र पट्टी डोळ्यांवर बांधली
दमडी न उरली हाती ,लक्ष्मी बाहेर पडली

धर्म तत्त्वांची माझ्या धूळधाण केली
क्षात्रतेजापुढे फितुरीची ढाल त्याने पकडली

सीमा न सोसलेल्या हालअपेष्टांना
नरमुंड -माला चंडी हवी सत्तालोलुप दैत्याला

चंडी भवानी च्या रूपाने आले कैक योद्धे
कर्मयोगाच्या तत्त्वावर गाडले कैक झेंडे

आता शृंखलांच्या पाशांतूनी मुक्त माझी भरत-भू
ऋणातून त्या वीरांच्या कशी मी मुक्त होऊ

सर्वत्र गाईन मी ही गाथा स्वातंत्र्याची
स्वातंत्र्य चिरायू ठेवण्या सामर्थ्य दे मनगटी

- कु. संजीवनी मराठे

# देशभक्ता प्रासाद बंदिशाला..

**या ज्वालेतून उठतील भावी क्रांतीचे नेते**

असा विश्वास असणाऱ्या देशभक्तांचा कारागृह हाच राजवाडा असतो . हातातील पोलादी बेड्या त्यांना पुष्पमाला वाटत असतात . फासावर जाण्याचा हाच त्यांचा राजदंड आणि चिता हेच त्यांचे सिंहासन असते . त्यांना अमरत्व देणारा मृत्यू हेच त्यांचे दैवत असते . स्वदेश पारतंत्र्यातून मुक्त करायला देशभक्त आपले बलिदान देतो . तो अपार कष्ट सहन करतो . देशभक्तीचे हे व्रत त्याने आनंदाने आणि सहेतुक स्वीकारलेले असते . हे व्रत दिव्य असले तरी दाहक आहे याची जाणीव असूनही ते तो स्वीकारतो . मनुष्याच्या अंगी निसर्गत:च काही प्रवृत्ती असतात . स्वतःच्या मातृभूमीबद्दल वाटणारे प्रेम हे अशा प्रवृतींपैकीच एक प्रवृत्ती आहे .

काही लोकांमध्ये ते जन्मता:च असते , त्यांना आपल्या देशाचा जाज्वल्य अभिमान वाटतो . स्वत:च्या देशाकरिता ते कोणतीही गोष्ट करण्यास सदैव तत्पर असतात . देशाच्या कल्याणाकरिता अहर्निश झटणे या व्यतिरिक्त दुसरा उद्योगच त्यांना ठाऊक नसतो . देशापुढे आप्त , गणगोत यांचा त्यांना विसर पडतो . तन-मन देशासाठी वेचण्याची त्यांची तयारी असते . देशाचे संकट ते आपले संकट , देशाची विपन्नावस्था ती आपली विपन्नावस्था असे त्यांना वाटते . वेळ पडली तर देशाकरिता ते आपल्या प्राणाचे बलिदान करण्यासही मागेपुढे पाहत नाहीत . प्राणत्यागापेक्षा दुसरा श्रेष्ठ त्याग या जन्मात कोणता असू शकेल बरं ?

याचं उदाहरण द्यायचं झालं तर फासावर जाताना भगतसिंग असेच हसले होते . *वंदे मातरम* अशी गर्जना करीत त्यांनी मृत्युला अलिंगन दिले होते.

सर्वच क्रांतिकारकांचा हा इतिहास आहे . आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके आजन्म पेठेच्या कारागृहात राहिले . राजगुरू आणि सुखदेव फासावर चढले . वि. दा. सावरकरांना अंदमानच्या तुरुंगात यातना सहन कराव्या लागल्या पण तरीही ते मायभूमीला परत जायला निघाले तेव्हा त्यांना निरोप देण्यासाठी कैद्यांनी कारागृहाबाहेर दाटी केली. एक बंदी अधिकारी भावी शिक्षेची पर्वा न करता आणि पाहाऱ्यावरील शिपायांना न जुमानता सावरकरांसमोर आला. त्याने चाफ्याच्या फुलांची केलेली फुलमाळ सावरकरांच्या गळयात घातली. जयजयकार करून तो निघून गेला त्यावेळी स्वातंत्र्यवीर सावरकरांना बंदिशाळा हा प्रासादच वाटला नसेल का ? देशभक्त इतरांप्रमाणे जिवंत असतानाच मरत नाहीत , तर मृत्यूनंतरही ते जिवंत राहतात.

मृत्यू त्यांना जिंकत नाही, ते मृत्यूला जिंकतात. संकट त्यांना पराभूत करीत नाहीत, ते संकटावर स्वार होतात. देशभक्त अश्रु गाळत नाहीत, ते देशाचे अश्रू पुसतात. देशभक्त हेच देशाचे सम्राट असतात. तेच लोकांच्या हृदयाचे राजे असतात.

आणि

अश्यातच १४ ऑगस्ट १९४७ ची मध्यरात्रीची वेळ घड्याळात

' ठण् ठण् ठण् ' बाराचे ठोके पडले. घड्याळाचे ठोके ऐकता ऐकता मला वाटलें - हा घड्याळ्याच्या ठोक्याचा आवाज नाही . हिंददेवीच्या हातापायांना दीडशे वर्षांपासून रखडलेला पारतंत्र्यरुपी साखळदंड खळ् खळ् तुटून पडण्याचा आवाज आहे . हा तो साखळदंड ज्या दिवशी तुटून पडला तो दिवस म्हणजे पंधरा ऑगस्ट हा होय . सारा भारत जागा होता . हर्षातिरेकाने सर्वांची झोपच उडाली होती . अगदी पाळण्यातील लहान-लहान अर्भकेसुद्धा झोपली नव्हती . सर्वांचे पंचप्राण कानात गोळा झाले होते आणि त्याच वेळी भारत माता स्वतंत्र झाल्याचे घोषित करण्यात आले . १५० वर्षांच्या गुलामगिरीचे पंचप्राण खळाळून पडले . उत्साहाला भरते आले , आनंदाला उधाण आले आणि लोक आनंदाने गाऊ लागले .

शतकानंतर आज पाहिली पहिली रम्य पहाट

तिमीराचा नाश झाला होता, स्वतंत्र सूर्याचा उदय झाला होता. मना-मनात केवढ्या आशा-आकांक्षा होत्या उरात किती सुख स्वप्ने होती . आज ७६ वर्षे झाली .

येणारी प्रत्येक सकाळ ही अशीच रम्य , मनोहर आहे . स्वराज्याचे सुराज्य होतांना दिसतेय .

- कु.निर्मिती रा. देवलसी

# मोर तो आता..

रंग वैभवा मत्सरे निरखूनी,
अलगद जाळे त्यास्तव पसरूनी,
क्रूर व्याधे जो सहजची धरला,
मोर तो आता मुक्त जाहला..

मोर दीनवाणा तरी लाघवे,
करी बापुडा कितीक आर्जवे,
उन्मत्त व्याध पण मुळी न ढळला,
मोर कसा मग मुक्त जाहला?

लचके अंगांगाचे तुटती,
रक्त सांडूनी पिसे विखुरती,
पिडा अतीव मरणप्राय साहला,
मोर तरी तो मुक्त जाहला..

क्षणी पण एका मिळे उभारी,
दूर सारूनी वैफल्य, लाचारी,
जिद्दीने तो पेटून उठला,
मोर प्रयत्ने मुक्त जाहला..

संघर्ष व्रण ही नवी भूषणे,
मिरवितो अंगी ती डौलाने,
नृत्यानंदे सुखे दंगला,
मोर तो आता मुक्त जाहला..

- सौ. रेणुका देशपांडे कुकडे

# झेंडा अमुचा प्रिय देशाचा

राष्ट्रध्वज हा आपल्या राष्ट्राचा सन्मान आणि अभिमान आहे. या ध्वजाला झेंडा असेही आपण म्हणतो. पूर्वी आपला देश एक खंडीत राष्ट्र होते. वेगवेगळया राजांच्या रियासती ह्या वेगवेगळ्या झेंड्यांनी दर्शविल्या जायच्या. पण जेव्हा इंग्रजांनी आपल्या भारतात शासन स्थापित केले तेव्हा त्यांनी एक झेंडा तयार केला. तो झेंडा इंग्रजांनी भारतात लागू केला. पण तो इंग्रजी झेंडा होता.

त्यानंतर १९६० साली कलकत्ता येथे काही क्रांतिकारकांनी भारताचा प्रथम झेंडा फडकवला . तो हिरवा, पिवळा, आणि लाल या रंगांचा होता. त्यात मध्यभागी 'वंदेमातरम् ' असं लिहिलेलं होतं. त्यानंतर भारतीय झेंड्यासाठी अनेक संकल्पना प्रस्थापित करण्यात आल्या. पण त्यांना तेवढी लोकप्रियता मिळाली नाही.

पुढे गांधीजींनी दक्षिण भारतात रहिवासी असलेले पिंगली वेंकैय्या यांना बोलाविले. जे एक स्वतंत्र भारत आंदोलनात क्रांतिकारक होते. त्यांनी अनेक देशांच्या झेंड्याचा अभ्यास केला आणि शेवटी आपला 'तिरंगा ' हा झेंडा बनवला.

आपला 'तिरंगा ' म्हणजे आपला राष्ट्रीय झेंडा, सगळयांच्याच परिचयाचा. केशरी, पांढरा आणि हिरवा अशा तीन रंगांचा हा तिरंगा व मध्ये २४ आ-यांचे अशोक चक्र असे, असे आपल्या झेंड्याचे स्वरूप आहे. हा राष्ट्रीय ध्वज खादीचा किंवा रेशमाचा बनवला जावा असा सरकारी नियम आहे. केशरी रंगातून, त्याग आणि धैर्य याचा बोध होतो. मधल्या पांढऱ्या रंगामध्ये सत्य धर्मांचा, शांतीचा आणि पावित्र्याचा बोध होतो.

हिरव्या रंगातून निसर्गाचा, समृद्धीचा बोध होतो. निळया रंगाच्या अशोक चक्रात भरतीय कला, तत्त्वज्ञान, इतिहास व संस्कृती यांचा संगम दर्शविला आहे.

अशा प्रकारे आपला ‘तिरंगा’ आपला राष्ट्रध्वज आहे. अगदी आपल्या सगळयांचा प्रिय असा.

- सौ. दिशा सचिन टिकेकर

# तो सूर्य तळपला तेव्हा..

तो सूर्य तळपला तेव्हा,
भू - माता स्वतंत्र झाली.
क्षितिजाने नव्या युगाची,
ती शुभ्र छटा ही ल्याली..!

आता त्या परकीय ढगांची ,
न उरली अधिक सावली !
स्वच्छंदी ती पाखरे ,
आकाशी झेपावली !

घरांवरली तुळशीपत्रे ,
आताशा बोलू लागली !
कारागृहात गोमांतक
आणि कमला प्रसवली !

कणाकणांत भरली ऊर्जा ,
देशभक्ती जागृत झाली !
मातृभूमीच्या जयघोषाने ,
हास्य सुमने ती उमलली !

कित्येक हुतात्मे झाले ,
प्राणाहुती कितींनी दिली..
न जाणे किती नयानांत ,
अश्रूंची गर्दी जमली !

ती गाथा बलिदानाची ,
वर्णिता ही जिव्हा थकली !
या लेखणीलाही आता ,
भावनेची बेडी चढली !

- कु. भार्गवी बाबरेकर

# स्वातंत्र्य? की अजूनही पारतंत्र्य?

१५ ऑगस्ट १९४७ रोजी मी म्हणजेच "भारत माता" स्वतंत्र झाली. ह्या वाक्याला आपण अस म्हणू या का की कागदोपत्री, गुलामगिरीतून स्वतंत्र झाली. असे म्हणायचे कारण काय? तर मी खरंच स्वतंत्र झाली का किंवा पूर्ण स्वतंत्र झाली का? हा प्रश्न अजूनही माझ्या मनात डोकावून जातो. आज स्वतंत्र झाल्याच्या इतके वर्षानंतर सुध्दा अनेक गोष्टी अशा आहेत की जे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने अजूनही पारतंत्र्यात, मागास, दुर्लक्षित अवस्थेत आहेत. मग अस असतांना मी पूर्ण स्वतंत्र आहे हे म्हणणे किती योग्य आहे ?

मुळात स्वातंत्र्य या शब्दाची खरी व्याख्या तरी काय ? एखाद्याच्या गुलामीतून मुक्त होणे म्हणजे स्वातंत्र्य ? आपल्याला हवे तसे वागता आले म्हणजे स्वातंत्र्य ? की कुठलंही शारीरिक, मानसिक दडपण, त्रास नसणे म्हणजे स्वातंत्र्य ? नक्की कुठल्या शब्दात आणि कशी स्वातंत्र्याची व्याख्या करावी. हो अस म्हणता येईल की व्यक्ती परत्वे व्याख्या बदलते आणि ती त्याच्या त्याच्या दृष्टीने योग्यही असते. नुसतं कागदोपत्री, सीमारेखा स्वतंत्र झाल्या म्हणजे पूर्ण स्वातंत्र्य मिळालं असं म्हणणं खरंच योग्य आहे का ?

मला स्वतंत्र करण्यासाठी माझ्या अनेक मुलामुलींनी प्रयत्न केले. अनेकांनी जीवही गमावला पण त्यांच्या वाट्याला मी तुकड्या तुकड्यातच आले. माझ्या सगळ्याच मुलांना मी आहे तशी अखंड मिळू शकली नाही. माझ्या प्रत्येक मुलाला खुश करण्यासाठी मला विभाजित व्हावचं लागलं. मला त्याचंही दुःख नाही. दुःख मात्र ह्याच आहे की परकीयांच्या जाचातून, त्रासातून मला मुक्त करून माझ्या मुलांनी आता मला स्वतःच्याच त्रासात अडकवला आहे. इतरांशी माझ्यासाठी लढता लढता ते एकमेकांशी कधी लढायला लागले हे ना त्यांना कळले ना मला. “दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ", असे म्हणतात न ते मी आजतागायत अनुभवत आली आहे.

माझ्या मुलांच्या भांडणाचा लाभ घेत आता बाहेरचे परत एकदा मला विळखा घालू बघत आहेत. आणि ह्या वेळेला हा विळखा उघड उघड नसून छुपा आहे जो जास्त घातक आहे. वैचारिक आघात , आर्थिक आघात , सांस्कृतिक आघात अशा अनेक प्रकारचे आघात आता माझ्यावर अप्रत्यक्ष रीतीने सुरू झाले आहेत. लवकरच जर ह्या सगळ्याला आळा घातला नाही तर मी परत गुलामगिरीत जाते की काय ह्याची मला आता काळजी वाटते आहे. आणि म्हणूनच मला प्रश्न पडतो की मी खरंच पूर्ण स्वतंत्र झाली आहे का ?

- सौ. मृण्मयी सारंग

# भारत ‘माझा’ देश आहे

आल्हादचे शाळेचे ऑनलाईन क्लासेस सुरू असतात,ब्रेक होतो तसं धावत किचनमध्ये जाऊन क्षिप्राला (आल्हादची आई) म्हणतो ,"आई मला आजच्या आज माझ्या प्रोग्रामचा ड्रेस हवाय, फक्त दहाच दिवस राहीलेत गं १५ऑगस्टच्या प्रोग्रामला"..

क्षिप्रा म्हणाली "हो ,बाळा तुझे क्लासेस आटोपले की आज जाऊया हं तुझा ड्रेस घ्यायला.."

आल्हाद म्हणाला "आई अजून किती दुकानात फिरवणारंय तू मला,काल इतकं फिरलो कुठेच मनासारखं मिळालं नाही, आणि जिथे मिळत होते तिथे काही क्वालिटी तरी होती का सांग तू मला... उगाच फिरण्यात टाइम अ‍ॅण्ड एनर्जी दोन्ही वेस्ट होते.. त्यापेक्षा मी आजच ऑनलाईन बुक करतो, दहा मिनिटात काम होईल.."

क्षिप्रा म्हणाली "हे काय रे,सगळं काही ऑनलाईन मागवतो तू नेहमी .."

"अगं आई सगळेच मागवतात आजकाल , आणि किती ईझी पडतं ते"आल्हाद म्हणाला..

यावरून दोघांत दोन दोन गोष्टी झाल्या पण आल्हाद ऐकायला तयार नव्हता,हा सगळा प्रकार हॉलमधे बसून क्षिप्राच्या सासुबाई बघत होत्या.. आल्हाद खोलीत गेल्यावर सासुबाई आल्या आणि विचारलं "काय हवंय गं त्याला असं जे काल दिवसभर सगळी दुकानं पालथी घातल्यावरही त्याला मिळालंच नाही"

"अहो आई त्याला Nike चेच शूज आणि Reebok चं टी-शर्ट हवंय" क्षिप्राने सांगितलं

"हे काय असतं" सासुबाईनी विचारलं

"Nike आणि reebok हे ब्रॅंड आहेत ,याचं प्रॉडक्शन दुसऱ्या देशात होतं आणि आपल्या देशात ते तिथून मागवले जातात" क्षिप्रा म्हणाली

अगं बाई हे मला नव्हतं माहिती, काय गं , आपल्या देशाचा स्वातंत्र्यदिन आपण दुसऱ्या देशात तयार होणाऱ्या वस्तू वापरून साजरा करायचा हे तुम्हाला तरी पटतं का गं"

क्षिप्रा म्हणाली "अहो आई पण तिकडे तयार होणारे सगळेच प्रॉडक्ट बेस्ट क्वालिटीचे असतात म्हणूनच मुलं त्याकडे आकर्षित होतात "..

सासुबाई बोलल्या "याचाच अर्थ काय तर ते लोक त्यांच्या संस्कृतीपासून पेहरावापर्यंत सगळ्याच बाबतीत आकर्षित करण्यात पूर्णपणे यशस्वी झालेत, आणि माझ्या मते याला सर्वस्वी जबाबदार तुम्ही लोक आहात, तुम्ही लहानपणापासून मुलांना फक्त ब्रॅंडेड वस्तू चांगल्या असतात हेच भासवलं, आणि यातूनच तुम्हाला देशाचा असणारा अभिमान, आपल्या देशावरचं प्रेम, देशभक्ती या सगळ्या गोष्टी स्पष्ट होतात, जिथे स्वत:च्या देशाप्रती आपुलकी नाही, आपल्या देशाच्या प्रगतीची काळजी नाही तिथे कितीही स्वातंत्र्यदिन साजरे केले तरीही त्याला काहीच अर्थ राहणार नाही.."

"आई ,असं काही नसतं हो, तुम्ही लोकं ना नविन ट्रेंडला ॲक्सेप्ट करूच शकत नाही म्हणून असे विचार आहेत तुमचे, आपल्या देशात तशी क्वालिटी मिळतच नाही म्हणून आपण तिकडचे ब्रँड वापरतो " क्षिप्रा बोलली

अगं क्षिप्रा पण मला सांग ना तुम्ही लोकांनी परदेशातून आलेल्या वस्तू घेतल्यावर पैसा सगळा तिकडेच जाणार आणि अर्थात त्यामुळे आपल्या देशातल्या उत्पादकांचे नुकसान होणारच,मग पुढे उत्कृष्ट क्वालिटीचं production करण्यासाठी त्यांना पैसाच मिळत नसेल तर ते तरी काय करणार..

कसं असतं , एकदा एखाद्या व्यक्तीला किंवा वस्तूला कुणी एकानी चुकीचं ठरवलं की सगळेच त्याला चुकीचं/ वाईट समजतात पण त्यामागची वस्तूस्थिती जाणून घेण्याचा कुणीही प्रयत्न करत नाही..

क्षिप्राला सासुबाईंचं म्हणणं पटलं होतं,तिने आल्हादला देखील या गोष्टीची जाणीव करून दिली ,मग आईने आणि आजीने समजवल्यापासून आल्हादने परदेशी ब्रॅंडेड वस्तू वापरायचे सोडून स्वदेशीचा स्वीकार केला..आता त्याने स्वत:च्या मित्रांनाही याबाबत जागरूक करायला सुरुवात केली होती..

***** **** *****

आज शैलेश ऑफिसमधून आल्यापासून जरा जास्तच अस्वस्थ होता, तो दाखवत नसला तरी तो कुठल्यातरी टेन्शनमधे असल्याचं समोर बसलेल्या शरदरावांच्या(शैलेशच्या वडीलांच्या) लक्षात आलं होतं..तो ऑफिसमधून आल्यापासून त्याला खूप फोन येत होते, शरदरावांची नजर टी.व्ही कडे होती पण कान मात्र शैलेशच्या बोलण्याकडे होते.. फोन वर बोलता बोलता शैलेश म्हणाला "तू काही पण कर यार पण इन्कम टॅक्स रिटर्नची फाईल लवकर तयार करून दे, आणि जमेल तितकं सेटींग कर प्लीज , मी इतका इन्कम टॅक्स कुठल्याही हालातीत भरणार नाही, त्यासाठी तूला जितकी फीज घ्यायचीय तितकी घे पण माझं काम करून दे बस..भाई सून,तू बस मेरा काम होने के बाद एक फोन कर दे,उसी दिन हम पार्टी करेंगे"

इतकं बोलून शैलेशनी फोन ठेवला.. पुन्हा पाच मिनिटांत दुसरा फोन आला "ठीक आहे मी १० मिनिटांत तुझ्या घरी पोहोचतो" असं सांगून त्याने फोन ठेवला आणि लगेच निघाला.. निघताना त्याने बाबांना सांगितले "आईला आणि अश्विनीला सांगा, उद्या ऑफिसची मिटींग आहे त्याविषयी थोडं काम असल्याने मित्राकडे जाऊन येतो, आल्यावर सोबतच जेऊया"..

शैलेश जाऊन बराच वेळ झाला तरी परत आला नाही म्हणून अश्विनी बाहेर येऊन वाट बघत होती तितक्यात शैलेश गाडी हातात घेऊन येताना दिसला, कशीबशी दारात आणून गाडी उभी केली आणि घरात येऊन फॅनखाली बसला..,

"का रे, गाडी हातात आणलीस ,ड्राय झाली की काय" अश्विनीने विचारलं

"नाही गं,पंक्चर झाली गाडी .." शैलेश चिडून म्हणाला

"इतके खराब झालेत रस्ते ,अर्धवट रस्त्याचं काम करून ठेवलंय, रस्त्याचं काम पूर्ण का करत नाहीत हे लोक तेच कळत नाही,एवढा पैसा मिळतो यांना काय करतात त्यांचं कुणास ठाऊक"

अश्विनी म्हणाली "हो ना , सरकार निवडून येताना फक्त नवनवीन घोषणा करतात ,पण प्रत्यक्षात त्यावर अंमलबजावणी झालेली दिसतच नाही, कामं लांबणीवर कशी लावावीत हे यांच्याकडून शिकावं"

शरदराव म्हणाले "अगं काम करण्यासाठी सरकारकडे तरी पैसा असायला हवा,तो पैसा ते तरी कुठून आणणार"

"बाबा,या ना त्या रूपात तो आपल्याचकडून काढून घेतला जातो,हे लोक काय स्वत:च्या खिशातून थोडीच लावणारेत" अश्विनी म्हणाली

"मग नाही तर काय, एकीकडे अमूक एका कामासाठी इतक्या खर्चाचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला असं सरकार सांगतं आणि दुसरीकडे सरकार पैसाच देत नाही म्हणून कंत्राटदार बोंबाबोंब करतात, मधल्यामध्ये पैसा जातो कुठे त्यांनाच त्यांचे माहिती,भ्रष्टाचार आहे नुसता दुसरं काय" शैलेश म्हणाला

आता न राहवून शरदराव बोलले "काय रे, भ्रष्टाचाराच्या गोष्टी तू करतोयंस.., मला सांग तूच मघाशी फोनवरून कुणाला तरी सांगितलंस ना मी इतका इन्कम टॅक्स कुठल्याही परिस्थितीत भरणार नाही,त्यात सेटींग करुन द्यायला सांगितलंस न",मग आता तू जर इन्कम टॅक्स भरायला तयार नाही तर मग सरकारने तुझी सोय का आणि कशी करावी..?

मला सांग नागरिकांकडून प्रत्येक गोष्टींवर घेतल्या जाणाऱ्या टॅक्स मधून नागरिकांना सुखसोयी , सुविधा उपलब्ध करून दिल्या जाऊ शकतात हे माहिती असल्यावर एक सुजाण नागरिक म्हणून आपलं कर्तव्य काय असायला हवं हे तुमच्या इतकं योग्य रीतीने कोण जाणू शकेल.."

शरदरावांचं हे बोलणं ऐकल्यावर सगळ्यांनाच आपण करत असलेल्या चुकांची आणि आपल्या कर्तव्याचीही पूर्णपणे जाणीव झाली होती..

शरदराव पुढे बोलत होते.." मला सांग शैलेश अरे आपण भरलेल्या टॅक्समधून आपल्याच सोयीसाठी खर्च केला जातो,तर मग आपण टॅक्स का भरण्याचं टाळतो,अरे सरकार आपल्याला जितकं देतेय तितकंच देणं आपलंही एक नागरिक म्हणून आपलं कर्तव्य आहे, आणि कधी थोडं जास्त द्यावं लागलं तरी मोठ्या मनाने द्यावं त्यात हरकत नसावी रे,आपण आपल्याच देशासाठी तर देतोय ना.."

एरवी घरात जास्त न बोलणारे शरदराव आज मात्र खूप मनापासून बोलत होते, देशाविषयी वाटणारी तळमळ त्यांच्या बोलण्यातून जाणवत होती..

अरे देशसेवा म्हणजे अगदी सीमेवर जाऊनच लढायला हवं असं नाहीये,प्रत्येकाला ते शक्यही नसतं ,पण आपण आपल्या परीने छोट्या छोट्या गोष्टींतूनही देशसेवा करूच शकतो..

आज आपण जर जास्तीत जास्त टॅक्स भरला तर त्यातून आपल्याच साठी अनेक नवनवीन सुविधा उपलब्ध करून देऊ शकतील ,इतर देशांप्रमाणे आपल्याही देशाच्या विकासाला हातभार होईल असा उदात्त विचार आपण ठेवला तर लवकरच आपलाही देश एक प्रगत, विकसित देश म्हणून इतर देशांप्रमाणेच मोठ्या थाटात मिरवू लागेल..

शरदरावांचा शब्द अन् शब्द खरा होता.. एखाद्या शिक्षित माणसालाही विचार करायला भाग पाडेल इतका मौल्यवान विचार आज त्यांनी सगळ्यांसमोर मांडला होता..

***** ***** *****

रजनी ही मुळातच अतिशय हुशार, महत्त्वाकांक्षी, मेहनती, आणि कर्तव्यतत्पर अशी व्यक्ती होती..आज रात्री झोपण्यापूर्वी रजनीने आपला नोकरी सोडण्याचा निर्णय फायनल करून त्याविषयी तिनं सासु-सासऱ्यांना सांगायचं ठरवलं होतं.. याआधी घरात याविषयी चर्चा केली तेव्हा सगळ्यांनी विशेषतः सासु-सासऱ्यांनी तिला इतकंच सांगितलं की मुलींसाठी शाळेची नोकरी ही नेहमीच सोयीची असते तेव्हा इतक्या वर्षांची नोकरी सोडू नये असं आम्हाला वाटतं पण बाकी आम्ही तुझ्या इच्छेच्या आणि निर्णयाच्या कधीच विरोधात नसू..

तुला नेहमीच आमचा पाठिंबा असेल.. खरंतर रजनीची आता नवा व्यवसाय/उद्योग सुरू करण्याची इच्छा होती ज्यातून स्वत: बरोबर इतरांनाही रोजगार मिळू शकेल..ती नेहमी म्हणायची "शाळेत एक शिक्षिका म्हणून देशाचा भावी नागरिक घडवताना त्यात माझा फक्त खारीचा वाटा असेल पण मी स्वत: एक उद्योजिका म्हणून काम करीन तेव्हा माझ्या बरोबर इतरांनाही रोजगार मिळवून देऊ शकल्याने मला स्वत:सोबतच समाजाचीही प्रगती होतेय याचं खूप मोठं समाधान आणि पर्यायाने माझ्या हातून देशसेवा घडत असल्याचा आनंद मी मिळवू शकेन, आणि यातून देशसेवेत माझं योगदान खारीच्या वाट्यापेक्षा निश्चितच मोठं असेल याचा सगळ्यात जास्त आनंद मिळेल"

तिच्या या मताशी सुयश (रजनीचा नवरा)अगदी सहमत होता.. रजनीने नोकरी सोडून नविन व्यवसाय करण्याचा जो निर्णय घेतला त्याचा तिच्या सासुबाईंना सगळ्यात जास्त आनंद झाला होता.. कारण कित्येक वर्षांपासून त्यांचीही स्वत:चा स्वतंत्र व्यवसाय सुरू करावा अशी तीव्र इच्छा होती आणि आज रजनीच्या या निर्णयामुळे त्यांची ती इच्छा पूर्ण होणार होती.. त्यांनी तिला सांगितले "रजनी आजपर्यंत तू घर,संसार, मुलं त्यांच्या सगळ्या गोष्टी सांभाळून नोकरी केली पण आता तू इतका मोठा व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेणारेस तेव्हा तो एका उंचीवर नेऊन पोहोचवायचा असेल तर तुला पूर्ण लक्ष फक्त आणि फक्त तुझ्या कामावर केंद्रीत करायला हवं आणि त्यासाठी तूला माझ्याकडून पूर्ण पाठिंबा आहे, मला शक्य होईल तितकं सगळं मी व्यवस्थित सांभाळीन,तू आता घराची आणि मुलांची अजिबात काळजी करायची नाहीस,तू आजपर्यंत जसं प्रत्येक काम जिद्द ,मेहनत आणि आत्मविश्वासाने करत आलीस तसाच तुझा व्यवसाय तुझ्या मेहनतीच्या बळावर मोठा कर, आणि एक चांगली उद्योजिका म्हणून नाव कमवून माझं इतके वर्षांचं राहिलेलं स्वप्न पूर्ण कर हीच माझी इच्छा आणि हाच माझा आशीर्वाद".

सासुबाईंच्या या बोलण्याने रजनीला अजूनच धीर आला होता,आता सर्वानुमते नोकरी सोडून नविन उद्योगाला लवकरच सुरुवात केली, एका वेगळ्या प्रकारच्या कापडापासून सुंदरशा बॅग्स तयार करण्याचं काम तिने सुरू केलं होतं,त्यात कापड तयार करण्यापासून तर ,तयार झालेल्या बॅग्स मार्केट मध्ये पोहोचवण्यापर्यंत प्रत्येक कामासाठी तिने वेगवेगळ्या माणसांना नेमलं होतं, यातून तिला पैसा, प्रसिध्दी आणि सोबतच अनेक गरजवंतांना रोजगार मिळवून दिल्याचं समाधान तिच्या सोबतीला होतं..

तिच्या मते कामातून मिळणाऱ्या पैशांपेक्षा त्यातून मिळणारं समाधान हे नेहमीच खूप मोठं असतं, या जगात स्वत:च्या प्रगतीसाठी, प्रसिध्दीसाठी झटणारे अनेक आहेत पण स्वत: सोबत देशाच्या प्रगतीचा विचार करणारे रजनीसारखे देशभक्त मिळायला खरोखरच भाग्य लागतं..अशा खऱ्या देशभक्तांनी या भारत भूमीत जन्म घेतला तर भारत देश सूर्याप्रमाणे आपल्या तेजाची प्रभा सर्वदूर पसरवेल यात शंकाच नाही..

**** ***** ****

- सौ. तृष्णा खर्डेनवीस आंबेकर

# राष्ट्राय स्वाहा इदं न मम...!

"देहाकडून देवाकडे जाताना देश लागतो आणि त्या देशाचे आपण देणे लागतो" हे वाक्य आहे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे. खरंच किती समर्पक आहे हे वाक्य नाही का? देह ते देव हा प्रवास करत असतांना त्यात मेख असते ती देशाची. ज्या देशात आपण जन्मतो त्याचं आपण देणं लागतो याचं भान आपल्याला कायम असायला हवं आणि आपण ते ठेवायला हवं.

गाव, शहर,राज्य,देश आणि राष्ट्र हा एवढा मोठा आवाका असतो तो त्या राष्ट्रपुरुषाचा. देश हा काही एक जमिनीचा तुकडा नाही तर तो एक देह आहे राष्ट्रपुरुष आहे हे सुद्धा आपण ध्यानात ठेवायला हवे. आपण ज्या देशात राहतो त्याबद्दल असलेला अभिमान तर आपल्याला असायलाच हवा पण त्याचबरोबर भारतीय म्हणून असणारी सगळी कर्तव्य आपण पूर्ण करायला हवीत. कर्तव्य हा फार मोठा शब्द झाला पण सगळ्यात आधी आपण नागरिक म्हणून किती सजग असतो हे विचार करण्यासारखे आहे. शालेय शिक्षण सुरू झाल्यापासून आपण शाळेत प्रार्थना झाल्यावर प्रतिज्ञा म्हणायचो तिथे आपली ओळख होते ती देशाशी त्यात असणाऱ्या परंपरांशी. त्या परंपरांशी पाईक राहण्याची प्रतिज्ञा जेव्हा खरी करण्याची वेळ येते तेव्हा मात्र आपण विचार करतो. पण कृती मात्र करत नाही.

राष्ट्राय स्वाहा हा आहुती मंत्र म्हणत असतांना आणि तो सार्थ करत असतांना सीमेवरच जायला हवं असं नाही. देशात राहत असतांना छोट्या छोट्या गोष्टींमधून सुद्धा आपण ते सार्थ करू शकतो. आपल्या कृतीतून का होईना आपण आपल्या देशाची मान उंचावू शकतो. आपला देशप्रेमाचा उत्साह हा फक्त २६ जानेवारी आणि १५ ऑगस्ट या दोनच दिवशी ओसंडून वाहत असतो. त्याचं सादरीकरण व्हावं याहीपेक्षा आपल्याला सुट्ट्या आहेत ना याचा आनंद जास्त असतो. खरंच आपल्या भावना इतक्या बोथट झाल्या आहेत का? आपलं देशावर किती प्रेम आहे हे दाखवण्यासाठी हे दोनच दिवस आपल्याला महत्वाचे वाटतात. दिवसभर गाड्या घेऊन वंदे मातरम् भारत माता की जय असं ओरडत फिरायचं आणि रात्री ओल्या पार्ट्या करून सेलिब्रेशन करायचं याला स्वातंत्र्य दिन म्हणायचं का?

तरुण युवा अश्या नावांनी ओळखली जाणारी आजची सळसळत्या रक्ताची तरुणाई! पण हे सळसळतं रक्त देशप्रेमासाठी सांडावं असं कोणालाच वाटत नाही. नावातच तरुणाई असलेली ही आमची पिढी का देशात होणारे अत्याचार थांबवू शकत नाही? पोलादी छाती आणि मनगटात असलेली ताकद याची जाणीव फक्त हेरोगीरी असलेले चित्रपट पाहतांना तात्पुरती होते पण प्रत्यक्षात तशी परिस्थिती आली तर आपण तिथून पळ काढतो.ही गोष्ट फक्त तरुणांची नाही तर तरुणींची सुद्धा आहे.

आपल्या याच देशात झाशीची राणी, राणी चेन्नमा, अहिल्याबाई होळकर, राजमाता जिजाबाई होऊन गेल्या. प्रत्येक वेळी शस्त्राने युद्ध करणं शक्य नसलं तरी काहीवेळी शास्त्राने उत्तर द्यावं याची साक्ष आणि शिकवण आपल्याला इतिहासात सापडते. याच मातीत छत्रपती शिवाजी महाराज,महाराणा प्रताप,भगतसिंग, राजगुरू, चंद्रशेखर आझाद, वासुदेव बळवंत फडके यासारखे अनेक हौतात्म्ये होऊन गेले. यांचं चरित्र फक्त वाचून पुस्तकात बंद करायला लिहिलंय का? तर ते जगता यायला हवं त्यातले विचार जर आपल्याला जगवता आले तर आपण या देशाचे नागरिक आहोत हे कुठेतरी सिद्ध होईल.

मी जे काही करतो किंवा जी काही कृती माझ्याकडून होते ती साधी नियमांचे पालन करण्याची असो,सेवाभावाची असो, सहानुभूती ची असो, कार्यतत्परतेची असो, देशात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीबद्दल आपुलकी,प्रेम, मदत करणे या भावना असो,माझं एक पाऊल सुद्धा आपल्या देशाच्या उन्नतीसाठी किंवा त्याला समृद्ध करण्यासाठीच पडायला हवं हा विचार असो ध्येय असो, जे जे काही सत्कृत्य माझ्या हातून घडतंय किंवा भविष्यात घडणार आहे ते सगळं या राष्ट्राचं आहे मी काहीही नाही ही प्रांजळ भावना हा समर्पण भाव सुद्धा येणारा प्रत्येक स्वातंत्र्यदिन सफल झाला असं म्हणायला आपल्याला भाग पाडेल. देशाबद्दल आणि सीमेवर लढणाऱ्या प्रत्येक जवानाबद्दल आपल्याला आजन्म कृतज्ञता असायला हवी आणि असाच प्रामाणिक प्रयत्न कायम घडायला हवा ही धारणा प्रत्येक तरूण पिढीची प्रत्येक व्यक्तीची झाली तर हा देश स्वतंत्र झालाच म्हणून समजा...!

- सौ. सायली अक्षय देशपांडे

# प्रिय आईस..

आज पहिल्यांदाच तुझ्याशी संवाद साधावासा वाटतोय..माहिती नाही का पण जरा बोलावंसं वाटतंय

येत्या १५ ऑगस्टला ७५ वर्ष पूर्ण होणार आहेत म्हणे आपल्याला स्वातंत्र्य मिळून.. पण खरंच स्वतंत्र झालोत का ग आपण? तू स्वतंत्र झालीस का? (कारण) तू स्वतंत्र व्हावीस..तुला मोकळा श्वास घेता यावा म्हणून अनेक लोकांनी प्राणांची आहुती दिली..पण खरंच त्याचं मोल आज आहे का?

आम्ही तुला भारत माता म्हणतो खरं पण खरंच तो आईचा मान आम्ही तुला देतो का असा प्रश्न पडतो कधी कधी..

तुझ्या आणि आमच्या बाजूला घडणाऱ्या सध्याच्या घटना पाहता कदाचित तुला ही जाणवलं असेल हे..कधीतरी!

कधीतरी कशाला..रोजच जाणवत असेल..

पण जे तुला रोज जाणवतं ते आम्हाला जाणवतं नाही याचं वाईट वाटतं.. जाणवत नाही म्हणण्यापेक्षा रोज ते जाणवत नाही असं म्हणूयात आपण.

कधीतरी कोण्या एका मुलीवर बलात्कार झाला की, किंव्हा कुठल्यातरी राज्यात बॉम्ब स्पोट झळकीच आजकाल हळहळ वाटते..आणि तिही तेवढ्यापुरतीच!

आणि समजा असं काही नाही झालं तर १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, पुण्यतिथी, जयंती, India VS Pakistan मॅच आहेच मग! हक्काचे! त्याच दिवशी फक्त देशभक्ती जागृत होते.. पण मग पुढे काय? ४ दिवस झालेत की परत पाहिले सारखंच..

खुर्चीत बसणाऱ्याच लोकांवरच देश सांभाळण्याची जबाबदारी असते असं आजकाल वाटतं सगळ्यांना..आणि सरकार कसं बेजबाबदार यावर शिक्का मोर्तब करून एका जबाबदार नागरिकाची जबाबदारी सहज झटकल्या जातेय ग.. शिवाजी जन्मावा पण तो शेजारी! आपल्याकडे नको! आपल्याकडे फक्त डॉक्टर्स आणि इंजिनीअर्सच जन्माला यायला हवेत अशी मानसिकता झाली आहे आजकाल लोकांची.

म्हणजे कसं झालंय माहिती आहे का..एखादी गोष्ट व्हावी असं वाटतं आम्हाला पण ती आम्हाला करायची नसते, त्याची जबाबदारी स्वतःला घ्यायची नसते.. दुसऱ्यांनी जर ते करून दिलं तर जास्त बरं होईल अशी अपेक्षा असते..

पण देशसेवा करण्यासाठी सत्तेची गरज नसते हे कोण आणि कसं समजावणार गं?

आपण साधे साधे नियम पाळून पण एका जबाबदार नागरिकाचं कर्तव्य नक्कीच पार पाडू शकतो हे कसं सांगायचं? आज नको नको त्या विषयांवर भयंकर राजकारण केलं जातं..आणि त्यात महत्त्वाचा मुद्दा बाजूलाच राहून जातो! असं एकही क्षेत्र नसेल जिथे आत्ता राजकारण होत नसेल..अगदी शिक्षणापासून तर दवाखान्यापर्यंत सगळ्याचाच बाजार मांडला जातोय...

स्वतंत्र भारतात जगतांना खरं तर आधीपेक्षा जास्त पारतंत्र्यात जगायला लागलोत की काय कोण जाणे!

हे सगळं आम्हाला आयतं मिळालं, आमच्या घरातून कोणी त्यासाठी प्राण पणाला लावले नाहीत म्हणून आम्हाला किंमत नाहीया का ग त्याची? पण मग असंही येतं मनात की जे लढले ते पण तर आपलेच होते..मग असं का!?

मनात खूप काही साचलेलं असतं..ते मोकळंही करायचं असतं पण कोणाशी बोलावं, कोणाला सांगावं हा प्रश्न पडतो..आपण बोललो आणि त्याचं राजकारण झालं तर? याचीही भिती वाटते..

जे चाललंय ते चूकच आहे हे कळतंय आम्हाला पण बहुदा वळत नाहीया..किव्हा मग आम्हाला नेमकं काय चुकतंय आणि कुठे चुकतंय हे जाणूनच घ्याचं नाहीया!

आम्ही सगळ्याचा उपभोग घेण्यात इतके गर्क झालोत ना की याचे गंभीर परिणाम होणार आहेत आणि ते आम्हालाच भोगावे लागणार आहेत हे कळतंच नाहीया!

आणि या सगळ्यांत आम्ही तुलाच कायमचं गमावून बसलो तर.....!???

तुझीच लेक

- कु. स्वर्णिमा प्रकाश

# मी भारत माता बोलतेय.....

काय रे बाळांनो कसे आहात? सगळं आलबेल नं.... दीड वर्ष झालं तुम्हाला कोणाला बाहेर फारसं बघितलं नाही रे!!! ते कोरोना का काय ते संपलं नाही का अजून??? काळजी वाटते रे बाळांनो तुमची.... शेवटी मी तुम्हा सगळ्यांची आई आहे ना... कसंय न, हे संकट जाईल पळून याची मला संपूर्ण खात्री आहे. पण हे एकच संकट नाहीये असं मला एका मुलीने सांगितलंय. खरं तर तिचे मुद्दे अगदी बरोबर आहेत, किंबहुना मलासुद्धा तुम्हा सगळ्यांमध्ये त्या सगळ्या त्रुटी दिसल्या... कधी कधी तर इतका राग येतो ना तुम्हा सगळ्यांचा... असं वाटतं की तुम्ही सगळे मिळून माझ्या संस्कृतीचा बट्ट्याबोळ कराल.

बरेचदा तर त्या मुलीच्या पत्रा प्रमाणे असंही वाटून गेलं की तुम्हाला माझ्याबद्दल प्रेमच उरलं नाहीये किंवा कधीतरी ठराविक दिवशीच ते जागृत होतं आणि त्याच दिवसाच्या शेवटी समाप्त सुद्धा होतं. आज पारतंत्र्यातून बाहेर पडून 75 वर्ष पूर्ण होतील मला. पण जेव्हा इतर देशांशी मी स्वतःची तुलना करते तेव्हा खरोखर असं वाटतं कि मागेच राहिले मी अजून.

मग मनात असा विचार येतो की दुर्लक्ष करावं का जास्त विचारच करू नये तुमच्या वागणुकीचा..... म्हणजे तुम्ही जागोजागी कचरा करता, साधे नियम पाळत नाही, भ्रष्टाचाराला वाव देता... पण दुसऱ्याच क्षणी विचार येतो, की असं कसं मी तुम्हाला एकटं सोडू? शेवटी तुम्ही सगळेच काही वाईट नाही.....

या सगळ्या जरी घोडचुका असल्या, तरी तुमच्यातले काहीजण अभिमानास्पद कामगिरी सुद्धा बजावतात की... म्हणजे अगदी आत्ता सुध्दा मी हे सगळं बोलत असताना, मला माहिती आहे की कुठेतरी शेतात एक शेतकरी प्रचंड मेहनत घेतोय, माझ्या पिलांची भूक भागवण्यासाठी, कुणा एका शाळेत शिक्षिका मन लावून शिकवतेय, भावी पिढी घडवण्यासाठी, कुठल्याश्या लॅब मध्ये एक शास्त्रज्ञ शोध लावतोय, आपल्या सगळयांच्या प्रगतिशील आयुष्यासाठी, एक चिकित्सक जीव तोडून मेहनत घेतोय, कोणा एकाचे प्राण वाचवण्यासाठी, अनेक असे युवा आहेत जे झगडतायत पर्यावरण वाचवण्यासाठी, निसर्ग वाचवण्यासाठी, काही राजकारणी स्वतःच्याच वागणुकीतून भ्रष्टाचार रुपी किडीला बाहेर काढून फेकतायत, माझे तरुण पोलीस शहरांमध्ये गुन्हे घडू नये याची खात्री बाळगतायत, तिकडे सीमेवर सैनिक गोळी झेलतायत, आपली रक्षा करण्यासाठी.

मान्य आहे की त्यांची संख्या आता हळूहळू कमी होत चालली आहे... पण म्हणतात ना, उम्मीद पे दुनिया कायम है.... असे मेहनती लोक बघितले की कुठेतरी मला एक आशेचा किरण दिसतो. वाटतं की हळू हळू सगळेच सुधारतील...

मग जेव्हा मीराबाई चानू, पी. व्ही. सिंधू यांच्यासारख्या माझ्याच मुली जागतिक पातळीवर माझी मान गर्वाने उंचावतात तेव्हा खरा अभिमान वाटतो मला.
कसंय ना बाळांनो... तुमच्या पूर्वजांनी खरोखर फार कष्ट घेऊन मला पारतंत्र्यातून बाहेर काढलंय.

आता माझ्या संरक्षणाची जबाबदारी संपूर्णपणे तुमच्या खांद्यावर आहे आणि माझी खात्री आहे की तुम्ही, माझी मुलं, या मातेचं संरक्षण तर करालंच पण माझं नाव सुध्दा नक्की दूरवर पोहोचवाल.

तुमचीच...

भारत माता

- कु.प्राजक्ता बर्वे

# समारोप

रसिकहो जूनच्या अंकापासून पुढील सगळ्या अंकांमध्ये आपण वेगवेगळ्या लेखिकांना यात सामावून घेणार आहोत.नवोदित आणि साहित्याची आवड असलेल्या "ती" चं हे हक्काचं पान असेल. प्रत्येक स्त्री मध्ये कुठेतरी एक लेखिका असते. लेखिका नसली तरी एखादी गोष्ट रंगवून सांगण्याची तिच्यात कला असते. ती उत्तम निवेदिका असते. तिच्यात हे सगळे गुण असतात फक्त ते कधी कधी सुप्त राहून जातात त्या गुणांना या माध्यमातून जागृत करण्याचा हा प्रयत्न.

आपलं प्रेम असंच असू द्या.पुन्हा भेटूया पुढील महिन्यात नवीन विषय आणि मासिकांकासह...!

आणि हो, तुमच्या पैकी कुणाला या उपक्रमात सहभागी व्हायचे असेल तर तुम्ही नक्की सहभागी व्हा. आम्ही आपल्या प्रतिक्षेत आहोत. या वाक्यावर क्लिक करून आपण या उपक्रमात सहभागी होऊ शकता. संपूर्ण नियमावली ही या फॉर्म वर उपलब्ध आहे.

आमचे आधीचे प्रकाशित अंक :

मार्च २०२१

एप्रिल २०२१

मे २०२१

जून २०२१

जुलै २०२१

आपल्याला जर अंक आवडला असेल तर कृपया आपले अमूल्य मत आम्हाला नक्की कळवा, खाली अभिप्रायासाठी लिंक देत आहोत..

## अभिप्राय


India
INDEPENDENCE
DAY